IBO IB DIPLOMA PROGRAMME
PROGRAMME DU DIPLÔME DU BI
PROGRAMA DEL DIPLOMA DEL BI

M02/181/S(1)

# MARATHI A1 – STANDARD LEVEL – PAPER 1
# MARATHI A1 – NIVEAU MOYEN – ÉPREUVE 1
# MARATHI A1 – NIVEL MEDIO – PRUEBA 1

Tuesday 21 May 2002 (afternoon)
Mardi 21 mai 2002 (après-midi)
Martes 21 de mayo de 2002 (tarde)

1 hour 30 minutes / 1 heure 30 minutes / 1 hora 30 minutos

## INSTRUCTIONS TO CANDIDATES

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Write a commentary on one passage only. It is not compulsory for you to respond directly to the guiding questions provided. However, you may use them if you wish.

## INSTRUCTIONS DESTINÉES AUX CANDIDATS

- Ne pas ouvrir cette épreuve avant d'y être autorisé.
- Rédiger un commentaire sur un seul des passages. Le commentaire ne doit pas nécessairement répondre aux questions d'orientation fournies. Vous pouvez toutefois les utiliser si vous le désirez.

## INSTRUCCIONES PARA LOS ALUMNOS

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Escriba un comentario sobre un solo fragmento. No es obligatorio responder directamente a las preguntas que se ofrecen a modo de guía. Sin embargo, puede usarlas si lo desea.

*पुढे दोन उतारे दिलेले आहेत. त्यापैकी एका उताऱ्याचे रसग्रहण करा.*

**1 (a)**

माती कोणतंही रूप धारण करते. ती प्रचंड जंगलाचा जसा उग्र आविष्कार करते, तसाच नाजूक, कोमल गवताचा आविष्कारही मैदानावर करताना दिसते. नाजूक, निष्पाप हरणं, ससे, दुबळ्या शेळ्यामेंढ्या, आक्रमक बलिवर्द, रेडे, दुडदुड दुडक्या चालीची तट्टं आणि दौड मारणारे घोडे, हे सगळे तिच्याच कुशीतले प्राणी. हे सगळे लहानमोठे प्राणी केवळ शाकाहारी म्हणजे मातीच्या अन्नदानावरच जगणारे असतात. चित्ते, लांडगे, तरसं, वाघ, सिंह हेही प्राणीच, पण केवळ मांसाहारी. हेही मातीचेच विविध चमत्कार. माती ही निसर्गाची क्रीडाभूमी असते. माती नसती तर निसर्ग नसता. निसर्गाचं सगळं सत्त्व केवळ मूळ मातीतच असतं.

चराचर जन्माला येतं ते मूळ मातीतूनच. मातीवर आलं की त्याला पालवी फुटते, पाय फुटतात, पंख फुटतात. वनस्पतींना फांद्या फुटून त्या विस्तारू लागतात. पानं, फुलं, फळं आली की त्यांचं सार्थक होतं. वनस्पती सगळ्या हिरव्याच दिसत असल्या तरी त्यांचे असंख्य प्रकार एकमेकांच्या शेजारी सुखानं राहून जगत असतात. प्रत्येकाला पानं असली तरी एकीचं पान दुसरीसारखं नसतं. एकीचं फूल दुसरीपेक्षा वेगळं. प्रत्येकीच्या फळाचा आकार, बिया, गंध, रंग, चव दुसरीपेक्षा वेगळी... मात्र हा एकाच मातीचा आविष्कार. मुळात 'माती' एवढंच एक सत्य. सृष्टीतील चराचराला आदिअंती व्यापून उरणारी फक्त मातीच असते.

माती तुम्ही चिमटीत घेऊ शकता. तळहातावर घेऊन निरखू शकता. वाऱ्यानं उडून माती डोळ्यांत जाऊ शकते, इतकी ती हलकी आणि सूक्ष्म असू शकते. पण समोरची पर्वतराजी झालेलीही मातीच असते. महाराष्ट्रभर पसरलेल्या सह्याद्रीच्या दणकट रांगा हीही महाकाय मातीच असते. ह्या रांगा नुसत्या पाहायच्या म्हटल्या तरी नजरेत मावत नाहीत, कल्पनेच्या पातळीवर मनात आकारूनही दशांगुळं उरतात.

ह्या मातीचं कोणतं रूप खरं? अणुरेणूंचं डोळ्यांत जाणारं कणरूप खरं की पर्वतपठारांचं डोळे फाडून टाकणारं जगड्व्याळ रूप खरं? ह्या मातीचा कोणता रंग खरा? फुलातून हळुवार उमलणारी तिच्या स्वभावातील नम्र कोमलता खरी, की गगनचुंबी वृक्षराजीतून, गिरिशिखरांतून उभी राहणारी ताठर उत्तुंगता खरी?

...चिमूटभर माती तळहातावर घेऊन हुंगली तर ती निर्गुण, निर्गंधी आणि निराकारही वाटते. पण तिचे विविध आविष्कार पाहिले तर ते अनेक गंधांनी, अनेक चवींनी, अनेक रूपाकारांनी नटलेले, अनेक ढंगांनी अवतरून सगुण, साकार झालेले असतात.

हातावर घेतलेली माती स्वतः हलत, बोलत नाही, चालत नाही. निश्चेष्ट पडलेली असते. संस्कृत भाषेत मातीचं एक नाव 'मेलेली' असं आहे. 'मृत्पिंड' या शब्दात ते सापडतं. पण हीच माती पाण्याच्या सहवासात आली की जिवंत होते, गंधवती होते. तिच्या अंगाखांद्यांवरच्या विजांना हिरवी पालवी, फुलं, फळं येऊ लागतात. माती मृत असूनही संजीवनवती असते. माती पळीभर घ्या किंवा पोतंभर घ्या, ती पूर्णरूपच असते. पूर्णातून पूर्ण काढून घेतल्यावरही माती पूर्णच उरत असते. ती फक्त असते. तिचे हातपायादी अवयव, मुख, शीर्ष, डोळे, नाक, कान, पुच्छ, पाठ, पोट, पंख इत्यादींनी युक्त शरीर दाखवता येत नाही. तरी ती जिवंत असते. तिच्या अस्तित्वाचा पडताळा तिच्यातून उगवणाऱ्या वृक्षवेलींतून येतो. तिच्यातील चिद्रूप चैतन्य सतत आणि सर्वत्र प्रत्ययाला येते. तिच्या फुलणाऱ्या निसर्गातून माती अन्नब्रह्म देते. तिचा हा चमत्कार मनालाही फुलवून जातो, आनंद देतो.

वेद-उपनिषदांतील सच्चिदानंद परमात्म्याची ज्ञानमीमांसा मातीला सर्वार्थांनी लागू पडते. त्या

परमेश्वरासारखीच माती निर्गुण, निराकार आणि निर्विकल्प आहे, तशीच ती सगुण, साकार आणि सविकल्पही आहे. ती तत्त्वतः एकमय आहे, तरी विविध रूपांनी जन्मणं, वाढणं आणि शेवटी पुन्हा मातीमय होऊन एकात्मतेत विलीन होणं, ही तिची प्रकृती असते. तिच्या प्रकृतीचं हे चक्र मातीत जन्मलेल्या, मातीवर वावरणाऱ्या प्रत्येक जीवमात्राला लागू पडतं.

खेड्यात जगणाऱ्या आणि मातीशी सतत संबंध असणाऱ्या प्रत्येक ग्रामीणाला हे मातीचं शाश्वत सत्य कळलेलं असतं. पण ते त्याच्या मनाच्या पहिल्या तळाशी सुप्त स्वरूपात पडून राहिलेलं असतं. शब्दप्रभूची भाषा, पंडितांचं तर्कज्ञान, अभिव्यक्तीचं सामर्थ्य त्या ग्रामीणाजवळ नसल्यानं त्याला ते व्यक्त करता येत नाही. म्हणून या सर्व नेणीव-जाणिवेला तो 'माती' असंच संबोधतो..आपण मातीतूनच जन्मलो, आपला पिंड मातीचाच आहे, आपल्या शरीरातील रक्तामांसांत, प्राणात मातीचीच स्पंदनं, मातीचंच चैतन्य, मातीचंच सर्व काही असतं याचा पडताळा त्याला मातीत जगताना पदोपदी येतो...म्हणून तो या सर्वांना मातीच म्हणतो...'माती' हा एकच शब्द त्याचा महावेद असतो. त्याच्या जीवनोपनिषदाचं 'माती' हेच मध्यवर्ती सूत्र असतं.

**– आनंद यादव, 'सच्चिदानंदवती माती', ''मौज'', दिवाळी २००१**

- माती आणि ग्रामीण व्यक्ती यांच्यातील परस्परसंबंधांच्या या उताऱ्यातील आविष्काराबद्दल काय म्हणता येईल?
- निसर्गातील विविध घटक येथे कसे उपयोगात आणले आहेत?
- मातीविषयीच्या लेखकाच्या भावना या उताऱ्यात कशा प्रकारे व्यक्त झाल्या आहेत?
- हा उतारा वाचून लेखकाबद्दल काय कल्पना निर्माण होते?

**1 (b)**

ही फिकी पडलेली
इवल्या चणीची पोर
अंधारमाखल्या हातांनी
सारवते आहे नशीब
पुढ्यात दुःखाने भरलेली
कळशी, शिगोशीग
दारिद्र्य लिंपण्याचे
कितिएक वांझोटे प्रयत्न
भवती पोपडे उडालेले सत्य
अन् आत फुटू आलेले
रसाळ स्वप्न

डेरेदार पोटावरून फिरतो
तिचा अशक्त हात
दुबळ्या भिंतीचा आधार घेत
ती राहते उभी सावकाश
आता कसे व्हायचे हिचे?
श्वास रोखला जातो माझा

पण ही फिकी पडलेली
इवल्या चणीची पोर
असा अंधारमाखला हात धुऊन
ऐटीत कमरेवर ठेवून
हसूही शकते की बिनघोर !

**– संगीता बर्वे, ''मृगतृष्णा'', १९९८**

- मुलीचे वेगळेपण येथे कशाप्रकारे प्रस्थापित केले आहे?

- या कवितेत प्रतिमांचा वापर कसा केला आहे?

- या कवितेबद्दल एक वाचक म्हणून काय प्रतिक्रिया होते?